OUR HERITAGE
ISSN (Online) : 0474-9030 Vol-67, Special Issue-11,
Dated 1st February 2020, Impact Factor (2020) - 6.8,

# मुगल कालीन स्थापत्य कलेचे आर्थिक विकासातील योगदान
## (औरंगाबाद शहरातील बीबी का मकबरा च्या संदर्भात)

**प्रतिभा लक्ष्मणराव म्हस्के**
**डॉ.एस.पी.टकले**
**लाल बहादूर शास्त्री महाविद्यालय, परतूर**

**स्तावना :**

मुगल कालीन इमारती त्यांची भव्यता, प्रमाणबद्धता ,कलात्मकता, रचना कौशल्य आणि वादातील सौंदर्य करिता विख्यात आहेत.विशाल गोलाकार घुमट, ओप्पो मिनार, जाळीदार नक्षीकाम, मेहरा कामासाठी मौल्यवान संगमरवरी दगडांचा व रत्नांचा वापर ,कलात्मक वेल, पट्ट्या ,चौरस छेद, बांधकामात रंगीत दगडांचा व संगमरवरी दगडांचा मोठ्या प्रमाणावर वापर ,मुद्दाम निर्माण केलेल्या योजना बंद बागा ,कारंजी ,कृत्रिम सरोवरे आदि गोष्टी मुगल शैलीची प्रमुख वैशिष्ट्य आहेत .हिंदू इराणी व मध्य आशिया शैलीचा कलात्मक संगम झालेला आहे.

शहाजहान च्या कारकिर्दीत सर्वाधिक उन्नतीचे परमोच्च शिखर मुगल स्थापत्य कलेने गाठले. शुभ्रधवल संगमरवरी दगडाच्या एकापाठोपाठ एक अनेक इमारती बांधून भारतीय स्थापत्य कलेच्या इतिहासात शहाजहानने आपले नाव अजरामर केले आहे. दिल्लीचा लाल किल्ला, लाल किल्ल्यातील दिवाण-इ-खास, रंग महल व दिवाने आम हे एक मजली शाही मंडप आणि लाल किल्ल्या जवळची जामा मशिद ही अतिभव्य शाही मजीद आग्र्याच्या लाल किल्ल्यातील दिवानी खास आणि सर्वाधिक सुंदर व आकर्षक मोठी मशीद, आग्र्यामध्ये यमुनेच्या तिरावरील जगविख्यात संगमरवरी मकबरा ताजमहाल, लाहोरच्या किल्ल्यातील दिवाने आम ,वसमत बुर्ज, शीश महाल ,नऊ लाख त्याचप्रमाणे काबुल, काश्मीर, अजमेर, कंदहार आदी विविध ठिकाणी बांधण्यात आलेल्या इमारती. महाल मेहरे आणि योजनाबद्ध रीतीने लावण्यात आलेली बाग-बगीचे शहाजहानच्या सुवर्णयुगाची साथ देत आजहि उभे आहेत.

याव्यतिरिक्तही मुघल काळात विविध स्थापत्यकला निर्माण करण्यात आल्या आहेत .त्यामध्ये बाबर पासून औरंगजेब पर्यंत विविध वस्तू शिल्प निर्माण करण्यात आले, यापैकी मुगल काळातील उतरत्या पर्वती, आकर्षक वस्तू म्हणजे बीबी का मकबरा होय ,या मकबऱ्याचे आजच्या काळातील पर्यटन स्थळांच्या अर्थाने अर्थव्यवस्थेवर बहुआयामी दृष्टिकोनातून परिणाम घडून येत असून त्याचा सक्षम अर्थव्यवस्थेसाठी महत्त्वपूर्ण योगदान देखील आहे.